I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 397-398
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# कर्मचारी प्रशासनासमोरील समस्या व आव्हाने एक अध्ययन

प्रा.जनार्धन प्रकाश पिंपळकर व कु.शारदा विठ्ठल पिंपळकर

एम.ए. समाजशास्त्र/ राज्यशास्त्र (एम.एड)
डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम चंद्रपूर

Communicated :20.02.2022 Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 Published: 01.04.2022

**संदर्भ :**

प्रस्तुत विषयाच्या अनुशंगाने कर्मचारी प्रशासनातील महत्वाच्या ज्या समस्या आहेत त्याचे निरिक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण उच्च पदावर असणारे व्यक्ती आणि निम्न श्रेणीतील कर्मचारी यांच्यातील संबंध हे कशाप्रकारचे आहे. या विषयीची संबंधात्मक खाखळीचा विचार करणे महत्वाचे ठरते. त्यामुळे या विषयाच्या आधारे कर्मचारी व प्रशासन यातील संबंधाचा विचार करणे. याविषयी चर्चा करणे महत्वाचे ठरते.

**बिजशब्द —** लोकप्रशासन, प्रशासकीय अधिकारी, विशेषज्ञ.

**प्रस्तावना:**

प्रस्तुत विषयाच्या अनुशंगाने समकालीन कालखंडामध्ये प्रत्येक व्यवस्थेमध्ये कोणत्या न कोणत्या स्वरूपाच्या समस्या दिसून येतात. कर्मचारी प्रशासनास देखील अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मुहात कर्मचारी प्रशासन हे अतिषय गुंतागुतीच्या व गतिषील मानवी वर्तन आणि व्यवहारांषी संबंधीत आहे. त्यामुळे प्रशासनामध्ये संरचानात्मक समस्या बरोबरच मानवी वर्तन व्यवहार व सबंधांषी अशा संबधीत अनेक समस्या निर्माण झाल्याचे पाहावयास मिळते. प्रशासनातील संरचनात्मक, संबंधात्मक पाहावयास मिळते. प्रषासनातील संरचनात्मक, संबंधात्मक प्रक्रियात्मक किंवा अमंलबजावणीशी संबंधीत अशा कोणत्या प्रकारच्या समस्या त्या धोरणाच्या योजना व कार्यक्रमाच्या अपयशास कारणीभूत ठरतात. अषाप्रकारे प्रशासनातील कोणत्याही प्रकारची समस्या प्रशासनाच्या समग्रतेस प्रभावित करत असते. भ्रष्टाचारासारख्या समस्येने प्रशासनास यंत्रणेला अकार्यक्षम, क्षमताहिन केले आहे. आज कर्मचारी प्रशासनासमोर भ्रष्टाचार, सामान्यज्ञ विशेषज्ञ वाद, अधिकारी पदाधिकारी वाद, आरक्षण तहस्यता विरूध्द प्रतिबध्दता, उत्तरदायित्व, नैतिकता या प्रमुख समस्याबरोबर दोशयुक्त भरतीप्रक्रिया, सेवांचे अवैज्ञानिक वर्गीकरण, दोशयुक्त मुख्यमापन, योग्य प्रशिणाचा अभाव, राजकीय हस्तक्षेप दोषयुक्त वेतन संरचना अनुशासन यासारख्या अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत, तथापि सामान्यज्ञ विशेषज्ञ वाद राजकीय पदाधिकारी प्रशासकीय अधिकारी संबंध आणि मनोबल इत्यादी प्रमुख असल्याचे दिसून येते.

**१) सामान्यज्ञ—विशेषज्ञ वाद:**

भारतीय प्रशासन व्यवस्थेस ब्रिटीशंच्या प्रशासन व्यवस्थेचा वारसा लाभलेला आहे. वर्तमान समावेश असल्याचे पाहावयास मिळते. विशेषत: सनदीस सेवेच्या संरचनात्मक आकृतीबंधाचा यामध्ये समावेश होता स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतीय समाजाच्या सामाजिक आर्थीक उद्देशामध्ये आमुलाग्र बदल झालेले आहेत. या बदलाच्या अनुषंगाने राष्ट्रनिर्मीबरोबर राष्ट्राचा सर्वागीण विकास साध्य करण्याचे आव्हान प्रशासकीय व्यवस्थेसमोर आहे. या विकासोन्मुख व्यवस्थेत सामान्यज्ञ प्रशासक की विशेषज्ञ यांच्यापैकी कोणाच्या भुमीकेस प्रशासनामध्ये मध्यवर्ती स्थान असावे आहे. मुळात हा वाद ब्रिटीशाकाळापासूनचा आहे. सामान्यपणे लोकप्रशासनामध्ये सामान्यज्ञ—विशेषज्ञ या दोघांनाही महत्वपुर्ण भुमीका पार पाडावी लागत असते मुलत: त्यांच्यामध्ये परस्पर अंतर्विरोध नसून त्यांच्या भुमिका परस्परपुरक आहेत. सनदी सेवेच्या प्रभावी कार्यप्रणालीसाठी या दोघामध्ये योग्य समन्वय असणे आवश्यक आहे.

**२) राजकीय पदाधिकारी व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे संबंध:**

वर्तमान शासन प्रषासन व्यवस्थेमध्ये राजकीय पदाधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांच्यासंबंधाना महत्व प्राप्त झाले आहे. प्रचलीन संसदीय शासन पध्दतीमध्ये मंत्री हा कायदेमंडळाचा एक भाग असतो. मंत्री हे विशिष्ट खात्याचे प्रमुख असतात. त्यांच्या नियंत्रणाखाली कायमस्वरूपी सनदी सेवक कार्य करीत असतात सैध्दातीक स्वरूपात मंत्री संबंधीतत विभागाचे धोरण निर्धारण, धोरणांची अमंलबजावणी विभागाशी संबंधीत बाबीसंदर्भात निर्णय घेणे धोरणांचे मुल्यमापन, निरिक्षण, उच्च पदावरील नियुक्तया लोकांच्या तक्रारीचे निवारण, विधीमंडळातील प्रष्नांना उत्तरे देणे आदी कार्ये करतात. तर प्रशासकीय अधिकारी संबंधीत विभागाच्या धोरणांची अमंलबजावणी करणे धोरण निर्मीतीमध्ये मंत्र्यांना माहिती पुरविणे, तांत्रिक सहाय्यता करणे, अधिनस्थ कर्मचाऱ्यांचे नियंत्रण आणि

विभागाच्या प्रशासनाचे संचालन करणे इत्यादी स्वरूपाची कार्ये करतात. राजकीय पदाधिकारी व प्रषासकीय अधिकाऱ्यांनी आपआपल्या कार्यक्षेत्रात राहून आपली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडणे अपेक्षित आहे. असे झाले तरच समन्वय व सुसंवादाद्वारे कार्य पार पाडले जावू शकते. मात्र बहुतेकवेळा मत्री आणि सनदी सेवकांत जी विवाद निर्माण होतो. त्यांचे मुळे कारण एकमेकांच्या कार्यातील अनावश्यक हस्तक्षेप असतो. मंत्री व सनदी सेवक यांच्यातील परस्पर संबंध हे जाणून घेण्याची घटकावर अवलंबून असतात राजकीय निर्माण पदाधिकारी व प्रषासकीय अधिकारी यांच्यात निर्माणत होणाऱ्या संघर्षाची संबंधातील तणावांची कारणे मंत्र्याची प्रशासकीय अनभिज्ञता, अहमभाव, पक्षीय राजकारणाचा प्रभाव दृष्टीकोन व कार्यपध्दती, उत्तरदायीत्वाचा अभाव हे दिसून येत असते.

**३) मनोबल:–**

कोणत्याही संघटनेच्या कार्यामध्ये मनोबल हा एक आधारभूत घटक मानला जातो. कार्यक्षम आणि यशस्वी प्रशासनासाठी कर्मचाऱ्यामध्ये उच्च प्रतीचे मनोबल असणे आवश्यक असते. कारण संघटनेचे यश आणि कर्मचाऱ्यांचे प्रषासकीय वर्तन मनोबलावर अवलंबून असते संघटनेची उद्दिष्टे कार्यक्षमपणे साध्य करण्याच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यामध्ये मनोबल कसे निर्माण करावे त्यामध्ये कषा प्रकारे वाढ करता येईल या संबंधीची समस्या आज कर्मचारी प्रशासनासमोर आहे. मनोबल ही समुहाच्या मनातील भावनात्मक प्रकृती आहे. जे समुहाच्या भावना विचार, कल्पना, जाणीव, प्रेरणा व प्रवृत्तीचे निर्देषक मानले जाते. एखादा कर्मचारी संघटनेतील कार्य किती निष्ठेने पार पाडतो यावरून त्या कर्मचाऱ्याचे मनोबल कसे आहे हे लक्षात येते. उच्च मनोबल असणे म्हणजे प्रशासकीय कार्यात कर्मचारी वर्गाचा पुर्ण सहयोग आणि परस्पर समन्वये आहे, असे मानले जाते. त्या दृष्टीने मनोबल म्हणजे जेथे व्यक्ती कार्य करत असतो. तेथील पर्यावरण त्याच्या सहकाऱ्याबरोबर व अधिकाऱ्याबरोबरचे संबंध त्यांच्या भावना, विचार, प्रेरणा, प्रवृत्ती व जाणिवांचा समन्वित परिणाम असते. एक प्रकारे मनोबल कार्याबाबतची मनोवस्था असते या मनोवस्थेचा खुप मोठा प्रभाव कर्मचारी प्रशासनावर पडत असतो.

मुल्यमापन :–

प्रस्तुत विषयाच्या माध्यमातून कर्मचारी वर्गाच्या विशिष्ट ज्या समस्या आहेत तसेच राजकीय प्रभावाचा जो परिणाम आहे. याविषयीची चर्चा यामध्ये करण्यात आली त्यामुळे या समस्या समजून घेण्यासाठी तसेच त्यावरील उपायोजना जाणून घेणे महत्वाचे ठरते.

१) कर्मचारी प्रशासनासमोर निर्माण होणाऱ्या विविध समस्यांची माहिती जाणून घेणे.

२) प्रशासनातील सामाज्ञ व विशेषज्ञ वादाचे स्वरूप त्यांचे स्थान व महत्व समजावून घेणे.

३) अधिकारी पदाधिकारी यांच्यातील संबंध व या संबंधास प्रभावित करणाऱ्या विविध घटकांची माहिती जाणून घेणे.

४) मनोबलाचा प्रशासकीय कार्य प्रक्रियेवरील प्रभाव आणि महत्व याविषयी जाणून घेणे.

५) मनोबल ही एक व्यक्तीगत आणि सामुहीक भावना किंवा प्रवृत्ती आहे. ती कर्मचारी कार्यप्रेरणेस किंवा त्याच्या निर्मीतीस सहाय्यभूत ठरत असते.

**संदर्भ :**

फडिया.बी.एल – लोकप्रशासन साहित्य भवन पब्लिकेशन आगरा

फडिया, कृलदिप – लोकप्रशासन (प्रशासनीक सिध्दांत) साहित्य भवन पब्लिकेशन आगरा

कोळंबे रंजन – भारतीय राज्यघटना आणि प्रशासन भगीरथ प्रकाशन

भदि, योगेश डॉ.कदम, दयानंद – मानव आणि वित्तीय संसाधन व्यवस्थापन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ